**नि.क्र.७०/क**

नि.दि.दावा नं. ५९/२०१७
धोंडु भोईर
वि.
परशुराम भोईर

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०४**

मी देवा शपथ खरे सांगते की:

माझे नावः शितल प्रकाशराव झोरे

वयः २३ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणार – रोहा, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. पी. जी. मुसळे यांचेमार्फत सुरू.**

०१. मला न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले होते. समन्सप्रमाणे मी आज रोजी मुळ कागदपत्र सोबत आणले आहेत. आज रोजी मी कागदयादी नि.क्र.६९ अनु.१ वर दि.१६.०१.२०१७ रोजी वादी धोंडु भोईर याने तत्कालीन ग्रामसेवक यांच्याकडे दिलेल्या अर्जाची या न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षक यांच्याकडुन पडताळलेली प्रत दाखल केली आहे. त्याची मुळ प्रत मी सोबत आणली आहे. आता मला कागदयादी नि.क्र.४ अनु.८ वरील दाखवलेली सदर अर्जाची स्थळप्रत आहे. त्यावर तत्कालीन ग्रामसेवक स्नेहा पिंपळकर यांची सही व ग्रामपंचायतीचा शिक्का आहे. त्यावरुन सदर अर्ज आमच्या ग्रामपंचायतीने त्यावेळी स्विकारल्याचे दिसत आहे. सदर अर्जास अभिलेखावरील ओळखनिश्चितीच्या हेतुने **नि.क्र.७१** देण्यात येत आहे.

०२. दि.१६.०१.२०१७ रोजीच्या वादीच्या अनुषंगाने तत्कालीन सरपंचाने प्रतिवादी परशुराम भोईर यांना दि.१७.०१.२०१७ रोजी नोटीस दिली होती. त्याची स्थळ प्रत माझ्याकडे आहे. आज रोजी मी कागदयादी नि.क्र.६९ अनु.२ वर त्या नोटीसीची या न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षक यांच्याकडुन पडताळलेली प्रत दाखल केली आहे. त्यावर परशुराम भोईर यांची तसेच सरपंच सुजाता बामणे यांची सही आहे. माझ्याकडे असलेल्या स्थळप्रतीप्रमाणे

त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर नोटीसीस निशाणी देण्यास विधिज्ञ श्री. एम. वाय. घायले यांनी हरकत घेतली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यावर सदर साक्षीदाराची सही नाही. याउलट विधिज्ञ श्री. पी. जी. मुसळे यांनी सदर कागदपत्र हा कार्यालयीन दस्तऐवज असल्यामुळे त्यास निशाणी देणे आवश्यक आहे असा युक्तीवाद केला. सदर नोटीस ही ग्रामपंचायत देवकान्हेतर्फे सरपंच यांनी जारी केल्याचे दिसुन येत असल्यामुळे त्यांनी निश्चितपणे त्यांना असलेल्या कार्यालयीन अधिकाराप्रमाणे सदर नोटीस जारी केल्याचे गृहीत धरणे आवश्यक आहे. भा. पु. का. कलम ११४ (इ) अन्वये कार्यालयीन कामकाज नियमितपणे केले जाते असे गृहीतक देखील आहे, त्यामुळे जोपर्यंत काही विरुध्द येत नाही तोपर्यंत सदर नोटीस ही नियमान्वये जारी केल्याचे गृहीत धरणे आवश्यक असल्यामुळे त्यास **नि.क्र.७२** देण्यात येते.)

०३. त्यानंतर दि.२३.०३.२०१७ रोजीच्या वादी धोंडुराम याच्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन सरपंचाने प्रतिवादी परशुराम भोईर यांना दि.२३.०३.२०१७ रोजी नोटीस दिली होती. त्याची स्थळ प्रत माझ्याकडे आहे. आज रोजी मी कागदयादी नि.क्र.६९ अनु.३ वर त्या नोटीसीची या न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षक यांच्याकडुन पडताळलेली प्रत दाखल केली आहे. त्यावर परशुराम भोईर यांची तसेच सरपंच सुजाता बामणे यांची सही आहे. माझ्याकडे असलेल्या स्थळप्रतीप्रमाणे त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर नोटीसीस निशाणी देण्यास विधिज्ञ श्री. एम. वाय. घायले यांनी हरकत घेतली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यावर सदर साक्षीदाराची सही नाही. याउलट विधिज्ञ श्री. पी. जी. मुसळे यांनी सदर कागदपत्र हा कार्यालयीन दस्तऐवज असल्यामुळे त्यास निशाणी देणे आवश्यक आहे असा युक्तीवाद केला. सदर नोटीस ही ग्रामपंचायत देवकान्हेतर्फे सरपंच यांनी जारी केल्याचे दिसुन येत असल्यामुळे त्यांनी निश्चितपणे त्यांना असलेल्या कार्यालयीन अधिकाराप्रमाणे सदर नोटीस जारी केल्याचे गृहीत धरणे आवश्यक आहे. भा. पु. का. कलम ११४ (इ) अन्वये कार्यालयीन कामकाज नियमितपणे केले जाते असे गृहीतक देखील आहे, त्यामुळे जोपर्यंत काही विरुध्द येत नाही तोपर्यंत सदर नोटीस ही नियमान्वये जारी केल्याचे गृहीत धरणे आवश्यक असल्यामुळे त्यास

**नि.क्र.७३** देण्यात येते.)

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम. वाय. घायले यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

०४. मी देवकान्हे ग्रामपंचायतीमध्ये दि.१७.१०.२०२४ पासुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी रुजु झाल्यापासुन सुजाता बामणे सरपंच नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या कशा सही करतात ते मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीकडुन एखादयाला उत्तर किंवा नोटीस देताना त्यावर कार्यालयाचा जावक क्रमांक नमुद करणे आवश्यक असते. दि.१७.०१.२०१७ व दि.२३.०३.२०१७ रोजीच्या नि.क्र.७२ व ७३ मधील नोटीसींवर जावक क्रमांक नमुद नाही. हे मला माहित नाही की, ग्रामपंचायत यांना आलेल्या अर्जाचे उत्तर ग्रामसेवकांच्या सहीने दयावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामसेवक म्हणुन माझ्या जबाबदा–या केवळ गावठाणापुरत्या मर्यादित आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील वाद शेतजमीनीबाबत होता. हे म्हणणे खरे नाही की, धोंडु भोईर याने अर्ज आमच्या ग्रामपंचायतीकडे दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे ग्रामपंचायतीने त्यांना कोणतेही उत्तर दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीने त्यांना उत्तर दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.02.05 11:01:41 +0530

(एस. व्ही. खैरे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.

स्थळ : रोहा.
दि. ०४.०२.२०२६